# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## ( शिक्षण विभाग )

**क्र. 1518 /शि.वि./2014** **दि. 21/01/2014.**

**प्रति,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ. /माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :— 26 जानेवारी "गणराज्य दिन" सोहळयाचे उत्साहाने आयोजन करण्याबाबत.**

**संदर्भ :— मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेमध्ये दि. 7 जानेवारी 2014 मध्ये झालेल्या सभेत दिलेल्या निर्देशानुसार.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या भारतीय सार्वभौम राष्ट्रात 26 जानेवारी **"गणराज्य दिन"** हा राष्ट्रीय सन आहे. हा सन आपल्या शाळेमध्ये उत्साहाने साजरा करावयाचा आहे. दरवर्षीप्रमाणे सकाळी प्रभातफेरीचे आयोजन करून यात शालेय विद्यार्थी, पालक, व परिसरातील नागरीकांचा सहभाग असावा विद्यार्थ्यांच्या हातात **"भारतीय प्रजासत्ताक दिन चिरायु होवो"** या घोषवाक्याचे आकर्षक फलक असावे. राष्ट्राशी संबंधित वेगवेगळे संदेश देणारे उदा. व्यसनमुक्ती, साक्षरता, पर्यावरण, एड्स, पल्स पोलिओ इत्यादीबाबत विविध आकर्षक घोष वाक्य लिहावे. राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहन कार्यक्रमा नंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करावे. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून त्यांना शुभेच्छा द्याव्यात. विविध स्पर्धांचे आयोजन करावे

कस्तुरचंद पार्क येथे होणाऱ्या शासकीय ध्वजारोहन कार्यक्रमात कवायतीमध्ये सहभाग घ्यायचा असेल तर त्या शाळांनी याबाबत माहिती तसेच सायंकाळी 5.00 वाजता डॉ. वसंतराव देशपांडे सभागृह, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे यामध्ये आपल्या शाळेतील उत्कृष्ठ सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्याकरीता विद्यार्थ्यांची माहिती कार्यालयात श्री. प्रशांत टेंभूर्णे यांच्याकडे दि. 22.01.2014 पर्यंत सादर करून आपल्या विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ दयावा. या कार्यक्रमाला मा. मंत्री महोदय उपस्थित राहणार आहेत.

सर्वांनी वरीलप्रमाणे नियोजन करून 26 जानेवारी **"गणराज्य दिन"** सोहळयाचे उत्साहाने आयोजन करावे.

**शिक्षणाधिकारी,**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी :—**

1. मा. जिल्हाधिकारी, नागपूर जिल्हा कार्यालय, नागपूर.
2. मा. अपर आयुक्त, म.न.पा., नागपूर
3. मा. उपायुक्त, म.न.पा., नागपूर